
## साईट प्रात्यक्षिके





















आई ऑफसेट/ 9970948544

केंद्र व राज्य शासन मान्यताप्राप्त
उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई
शासन निर्णय शासन मान्यता प्राप्त क्र. मराव्यशिपम/का-२/मान्यता २०१०-११/१४०६ दि.२६.०५.२०१०
शासन मान्यता क्र. मराव्यशिपम/का-१/मान्यता ११/११८६ दि.०४.०५.२०११

### उज्वल प्रतिष्ठाण अंबाजोगाई संचलित,

# उज्वल तंत्रशिक्षण कॉलेज

## माहिती पुस्तिका




पत्ता : यशवंतराव चव्हाण चौक, डी.सी.सी. बँकेजवळ, मोरेवाडी, अंबाजोगाई, जि.बीड
Mob. 9860940510 | Fax : (02446) 243030 | Email : ujjwalpratishthan@gmail.com

# संस्थेतील साहित्य, साधने व फर्निचर













# साईटवरील प्रात्यक्षिके












## उज्वल तंत्रशिक्षण कॉलेजचे
## उद्घाटन श्री.राजेश जोशी (उपजिल्हाधिकारी) अंबाजोगाई, जि.बीड यांच्या हस्ते दि. २५.०६.२०१०



## उज्वल तंत्रशिक्षण कॉलेज स्टाफ व विद्यार्थी






# प्रास्ताविक

महाराष्ट्रात सर्वत्र शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे हे आव्हान पेलण्यास आमचे कॉलेज सज्ज व कटीबद्ध आहे. देशातील अन्य राज्यापेक्षा महाराष्ट्र हे झपाट्याने बदलणारे राज्य आहे. याच अनुषंगाने विविध शहरांचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे.

महाराष्ट्रातील मोठ्या शहरात गेले की स्वच्छ अन चकचकीत रस्ते, मोठे मोठे उड्डाणपूल, वाहतूक बेटांचे सुशोभिकरण, मोठ मोठ्या इमारती नजरेसमोर पडतात. हा सारा विकास तंत्र शिक्षणाने घडवून आणलेला आहे. आजचा कॉलेजचा विद्यार्थी हेच उद्याचे लोक नेतृत्व व उद्योजक आहेत. या तरुण मनात आपण सामाजिक जाणीव निर्माण करुन त्यांच्यात राष्ट्रापुढील समस्याबाबत जागृती करणे व हे प्रश्न सोडविण्यासाठी शीस्तबद्ध जीवनाची समर्पण वृत्तीचे जोपासना करणे हे आमच्या शिक्षण संस्थेचे कर्तव्य आहे.

मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागातील ग्रामीण परिसरातून या कॉलेजमध्ये येणारा विद्यार्थी हा अत्यंत गरीब, शैक्षणिक परंपरा व वातावरण नसलेल्या समाजातून मुख्यतः आलेला असतो. सभोवतालच्या प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत त्यांच्यावर उत्तम संस्कार होतील, त्यांच्या व्यक्तीमत्वाची उत्कृष्ठ घडण होईल यासाठी जरुर ती संधी व वातावरण त्यांना आमच्या कॉलेजमध्ये उपलब्ध करुन दिले जाते.

या संकल्पनेतून कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होईल असे अभ्यासक्रम व विविध उपक्रम संस्थेच्या वतीने चालविले जातात. कष्ट करण्याची ज्या विद्यार्थ्यांची तयारी आहे अशा गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी आमच्या कॉलेजतर्फे त्यांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच कॉलेजमध्ये स्पर्धा व व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि स्वयं अनुशासन वृद्धींगत होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो.

आजचे युग हे स्पर्धेचे युग असुन विद्यार्थ्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी तंत्र शिक्षणाची गरज आहे व हे काम आमचे कॉलेज प्रामाणिकपणे करीत आहे.

उज्वल तंत्रशिक्षण कॉलेजचा निकाल पाहता कॉलेजने या शैक्षणिक वर्षात बीड जिल्ह्यात प्रथम येवून संस्थेने हा बहूमान मिळविला. यामध्ये सर्वच शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खूप मेहनत घेतल्यामुळे व तसेच विद्यार्थ्यांनीही परिश्रम घेतल्याने आम्ही या यशाच्या सर्वोच्च शिखरापर्यंत पोहचू शकलो. सर्व विद्यार्थ्यांना माझ्यातर्फे हार्दिक शुभेच्छा व संस्थेच्या भावी वाटचालीस असेच सर्वांचे योगदान लाभेल अशी आशा व्यक्त करतो.

संस्थेने चांगली प्रगती करावी व कॉलेजचे नाव हे महाराष्ट्रातीलच नाहीतर भारतात व्हावे हीच अपेक्षा व्यक्त करुन संस्थेच्या पूढील वाटचालीस माझ्या तर्फे मनापासून हार्दिक शुभेच्छा...!

**प्राचार्य**



## उपलब्ध व्यवसाय अभ्यासक्रम विषयक माहिती

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | कालावधी | जागा | शिक्षण | माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व्हेअर / भूमापक | २ वर्षे | ७५ | १० वी पास | मराठी |
| २ | इलेक्ट्रिशियन | २ वर्षे | २५ | १० वी पास | मराठी |
| ३ | बांधकाम पर्यवेक्षक | १ वर्षे | ५० | १० वी पास | मराठी |

**टीप :–**

१) वरील सर्व अभ्यासक्रम उत्तीर्ण ११ उमेदवारांची सुशिक्षीत बेरोजगार सहकारी पतसंस्था स्थापन करुन विना डिपॉझिट शासकीय निमशासकीय कामाचे कंत्राट घेता येतात असा शासन निर्णय पारित करण्यात आला आहे.

२) बांधकाम पर्यवेक्षक इलेक्ट्रीशियन सर्व्हेअर उत्तीर्ण उमेदवारांना पॉलिटेक्निक/ इंजिनिअरींग व इतर शाखेसाठी द्वितीय वर्षात थेट प्रवेश.

### ✻ उज्वल भविष्यातील संधी ✻

✻ १००% नोकरीची हमी देणारे अभ्यासक्रम.

✻ शासनाच्या बांधकाम विषयक सर्व प्रकारच्या कार्यालयामध्ये भरपूर जागा.
उदा. जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर/महानगरपालिका, ग्रामपंचायत, भूमी अभिलेख, पाटबंधारे विभाग.

✻ प्रशिक्षणानंतर उपलब्ध रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी. महावितरण कंपनी, खाजगी उद्योगात, रेल्वे बोर्डात, एम.आय.डी.सी., एस.टी., टेलिफोन विभाग, एअरलाईन्स विभाग, पी.डब्ल्यू.टी., बँक, हॉस्पिटल,

✻ ग्रामीण तसेच शहरी भागात इलेक्ट्रिकल स्विच गिअर, मोटार दुरुस्ती व सर्व्हिसिंग सेंटर ची उभारु शकता. हाऊस वायरिंग ची कामे घेवून स्वयंरोजगराची संधी उपलब्ध होऊ शकते. तसेच वायरमन, सुपरवायझर, विद्युत परवाना घेवून शासकीय कंत्राटदार होऊ शकता.

# ✻ शैक्षणिक वेळापत्रक ✻

१) प्रवेश सुरुवात १ जून पासून ३० जुलै पर्यंत प्रवेश घेवू शकता. त्यानंतर आपल्या प्रवेशा बाबत कसलाही विचार केला जाणार नाही.
२) सत्र कालावधी – जानेवारी ते जून
३) अंतीम परीक्षा – एप्रिल
४) निकाल – परीक्षा संपल्यानंतर कमीत कमी व जास्तीत जास्त ४० दिवसात घोषित होईल.

**विशेष सूचना :–** दरवर्षी वेळापत्रकानुसार वेळापत्रकात बदल होऊ शकतो. झालेला बदल त्यावेळी कळविला जाईल. त्यासाठी संस्थेशी संपर्कात राहावे.

**शैक्षणिक सहल :–** या उपक्रमात शैक्षणिक सहल दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात औद्योगिक/ऐतिहासिक ठिकाणी होईल.

**सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शन केले जाईल.**

## ✻ संस्थेचे नियम व अटी ✻

✻ वर्षभरात ७५ टक्के विद्यार्थ्यांची प्रझेंटी आवश्यक आहे. तरच विद्यार्थ्याला परीक्षेत बसता येईल.
✻ प्रवेश घेतेवेळी कमीत कमी ५० टक्के फीस भरल्यानंतरच प्रवेश निश्चित होईल.
✻ विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेअगोदर राहिलेली सर्व फीस भरली तरच परीक्षेचे हॉल तिकीट मिळेल. अन्यथा कोणत्याही कारणास्तव मिळणार नाही आणि होणाऱ्या नुकसानीची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांची राहिल.
✻ विद्यार्थ्यांनी प्रवेशासोबत १०० रुपयाचा कोऱ्या बाँड वर सही करुन देणे आवश्यक आहे.
✻ अर्ध्यावर कॉलेज सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडून फीस कायदेशीररित्या वसूल केली जाईल.
✻ एकदा भरलेली फीस कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.
✻ फीस इन्स्टॉलमेंट कमीत कमी दोन वेळा देण्यात येईल.
✻ प्रवेशाविषयी सर्व अधिकार संस्थेकडे राखीव राहतील.
✻ रजिस्ट्रेशन फीस १००० रु. राहील व फीस भरून प्रवेश १५ दिवसांत घ्यावा लागेल. अन्यथा आपले रजिस्ट्रेशन रद्द केले जाईल.



# ✻ कॉलेजची वैशिष्ट्ये ✻

प्रशस्त इमारत, ग्रंथालय, पूर्णपणे प्रशिक्षीत अनुभवी निदेशक वर्ग, चालू असलेल्या बांधकामावर/साईटवर जास्तीत जास्त प्रात्यक्षिके, मुला/मुलींना स्वतंत्र बॅच ची सुविधा, एस.टी. पासची सोय, मूलभूत सुविधा उपलब्ध, स्वतंत्र इलेक्ट्रिकल लॅब ची सुविधा.

**✻ बांधकाम पर्यवेक्षक/सर्व्हेअर या अभ्यासक्रमाला लागणारे साधन व साहित्य :–**

कॉम्प्युटर सेट, डंपी लेवल, चेन/साखळी, लेवलिंग टॉप, कॉस टॉप, लेव्हल स्टँड, लेव्हल ट्यूब, गुण्या, टेप, कन्स्ट्रक्शन हेल्मेट, वोळींबा, रंधा, थापी, खोरे, टोपले, दोरी, नेहला, ब्रश, लेवल बॉटल, छनी, कुंज कोपरी, पॉलिश पत्रा, छर्रा मशीन, डेक्स, सनमाईक टेबल, लोखंडी टेबल, गोदरेज कपाट, फायबर खुर्च्या, कर्मचारी व विद्यार्थी फलक, सूचना फलक, फॅन + ट्यूब, सनमाईक बोर्ड, नेत्यांचे फोटो, पुटी पत्रा, रोलर ब्रश, हातोडा, प्लॅन टेबल, सायटर, शंकू साखळी, साखळी (३३ फुट), टाचण्या, पिन, थम्पपिना, स्केल पट्टी, दूर्बिन मशिन, सेट स्केअर.

**✻ इलेक्ट्रिशियन या अभ्यासक्रमाला लागणारे साधन व साहित्य :–**

डिजिटल मल्टीमिटर, ॲमिटर (डी.सी.ओ.१.५ ॲम्प.), ॲमिटर (डी.सी.ओ.१५ ॲम्प.), ॲमिटर (ओ. १.५ ॲम्प.), ॲमिटर (ओ. १० ॲम्प.), ॲमिटर (ओ. १५ ॲम्प.), व्होल्टमिटर (ओ. ३०० व्ही. डी.सी.), व्होल्टमिटर (ओ. ५०० व्ही. डी.सी.), व्होल्टमिटर ए.सी. / डि.सी. ०–५०० व्ही., मल्टिमिटर (मेको), मल्टीमिटर सनवा, मल्टीमिटर आर.एस.डी., सिलींग फॅन, आय.सी.टी.पी. मेन स्वीच १६ ए, आय.सी.डी.पी. मेन स्वीच, सनमाईक बोर्ड १० १२, वूडन बोर्ड १० १२, सी.एफ.एल. स्ट्रीट लाईट सेट, सर्व्हिस टेस्ट लॅब मॉडेल, १५ एम.एच.झेड. सिंगल ट्रेस आयसोलोस्कोप, चार्जिंग बॅटरी ६ व्हॅ., रबर मॅट (पॉवरप्रुफ), ॲमबॅटरी, बॅटरी

✲ **फ्लोरोसंट ट्युबची जोडणी**

ट्युब स्टार्टर व होल्डर, ट्युब रॉड, ट्युब चोक, एक दिवा एका स्विचने नियंत्रित करणे, जिना वायरिंग, **वायरचे प्रकार :** पी.व्ही.सी. के. वाचर, व्ही.आय.आर.वायर, ७/२० पी.व्ही.सी. कॉपर वायर, ७/२० पी.व्ही.सी. ॲल्यु. वायर, ३/२० पी.व्ही.सी. कॉपर वायर, ३/२० पी.व्ही.सी. ॲल्यु. वायर, १/१८ पी.व्ही.सी.कॉपर, १/१८ सी.टी. एस. वायर, सबमर्सिबल वायडिंग वायर, हुक अप वायर. **जॉईंटचे प्रकार :** वेस्टर्न युनियन जॉईंट, ब्रिटानिया टी जॉईंट, ब्रिटानिया सरळ जॉईंट, ७/२० पी.व्ही.सी. वायर, ७/२० पी.व्ही.सी. सरळ जॉईंट, ३/२० पी.व्ही.सी. वायर टी जॉईंट, ३/२० पी.व्ही.सी. वायर सरळ जॉईंट, १/१८ पी.व्ही.सी. वायर टी जॉईंट, १/१८ पी.व्ही.सी. वायर सरळ जॉईंट, लूप, हूक, रॅटटेल जॉईंट, **केबल वायर चे प्रकार :** पी.व्ही.सी. टू कोअर अर्मड केबल, पी.व्ही.सी. कोअर अनअर्मड केबल, ७/२० पी.व्ही.सी. सर्व्हिस वायर, पी.व्ही.सी. फोर फे. केबल (राऊंड), पी.व्ही.सी. थ्री कोअर फे. केबल, पी.व्ही.सी. टू कोअर फे. केबल राऊंड, पी.व्ही.सी. टू कोअर फे. केबल फ्लॅट, २.५ पी.व्ही.सी. मल्टिस्टँड वायर, पी.व्ही.सी. टू कोअर कॉटन कव्हर वायर





## ✲ प्रवेशासाठी अर्ज करण्याची पद्धत ✲

✲ उज्वल तंत्र शिक्षण कॉलेज या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज हा सदरील माहिती सोबत जोडलेला आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

✲ प्रवेश अर्जासोबत टी.सी. / सनद या प्रमाणपत्राच्या मुळप्रती जोडलेला अर्ज दिलेल्या अंतीम दिनांकापर्यंत संस्थेच्या कार्यालयात सादर करावा.

✲ अर्जासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सक्षांकित केलेल्या झेरॉक्स तीन प्रती जोडणे आवश्यक आहे.

✲ अर्जासोबत एक त्यासोबत तीन फोटो जाडावेत.

✲ अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

✲ १० वी पास, १२ नापास या पैकी ज्या अर्हतेच्या व्यवसाय अभ्यासक्रमास प्रवेश उपलब्ध असतील त्यानुसार प्रत्येक अर्हतेस अनुसरुन स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.

✲ प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी पूर्ण प्रवेश फी भरणे आवश्यक आहे.

✲ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यापूर्वी प्राचार्यांची संमती घेतली पाहिजे.

✲ कॉलेजमध्ये एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द होणार नाही.

✲ महाराष्ट्र राज्यात मोठ्या, माध्यम आणि लघु उद्योगांची वाढ झाल्यामुळे कामगारांची गरज निर्माण झाली आहे. त्याच बरोबर स्वयंरोजगाराच्या संधीचा वाव आहे. त्यानुसार विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

✲ अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) सर्व अभ्यासक्रमासाठी टि.सी. मुळ / सत्यप्रत (झेरॉक्स)

२) १० वी पास सनद मुळप्रत देणे आवश्यक.

३) पास पोर्ट साईज ४ फोटो

४) जातीचे प्रमाणपत्र सत्यप्रत देणे.